**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 | Impact Factor – 7.328
Peer Reviewed | Bi-Monthly
Vol. 11 No. 3 | Jan-Feb 2024

# महात्मा जोतिराव फुले यांची ग्रंथसंपदा

**अमित अशोक पाटील**
संशोधक विद्यार्थी
**Corresponding Author – अमित अशोक पाटील**
**Email:** aapatil9449@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.12926052**

**प्रस्तावना:**

महात्मा ज्योतिबा फुले या महामानवाचा जन्म या महाराष्ट्रात झाला व त्यांच्या कार्यामुळेच आजचा प्रगतशील महाराष्ट्र फक्त प्रगतशील न राहता पुरोगामी सुद्धा झाला. १९ व्या शतकात महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणात सामाजिक व आर्थिक अराजकता पसरली होती व सामाजिक अराजकते मागे महत्त्वाचे कारण म्हणजे जात व्यवस्था, अस्पृश्यता, उच्च-कनिष्ठ भेद, अंधश्रद्धा, शैक्षणिक मागासलेपणा या सर्व कारणामुळे तत्कालीन समाज व्यवस्था अतिशय भेदभाव पूर्ण बनली होती. याचमुळे कनिष्ठ वर्गावर खूप मोठ्या प्रमाणावर निर्बंध लादले. त्यांची जात व्यवस्था व सामाजिक कुप्रथा जसे की जरठ कुमारी विवाह, बालविवाह, विधवा विवाह बंदी, सती प्रथा, अस्पृश्यता, नरबळी व मंदिर प्रवेश या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निर्बंध लादले जात होते. या सर्व निर्बंधातून तत्कालीन समाजाला मुक्त करण्यासाठी महात्मा फुलेंनी शैक्षणिक कार्य व सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून व समाज जागृतीचे कार्य केलेच पण त्याचबरोबर तत्कालीन उच्चभ्रू वर्गामार्फत होत असलेल्या अन्यायकारक गोष्टींना वाचा फोडण्यासाठी विविध विषयांसाठी विविध स्वरूपात ग्रंथरचना केली. त्यात सर्व ग्रंथांचा परामर्श आपण पुढील भागात पाहणार आहोत.

**उद्दिष्टे:**

१. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समाज कार्याचा आढावा घेणे.
२. महात्मा फुले यांच्या ग्रंथसंपदांचा अभ्यास करणे.

**महात्मा ज्योतिबा फुले परिचय :**

जन्म ११ एप्रिल १९२७ मुळगाव कटगुण (सातारा) जन्म – धनकवडी, पुणे, आडनाव-गोरे (वडील फुले विकत म्हणून, फुले आडनाव)

१८३४ ते १८३८ प्राथमिक शिक्षण पंतोजी शाळेत, १९३८ शिक्षण बंद- वडिलांनी त्यांना फुले व्यवसायात गुंतवले. परत १९४१ मध्ये स्कॉटिश मिशनरी शाळेत उर्दू शिक्षक गपार बेग मुन्शी व मि.लिजिट यांच्यामुळे माध्यमिक शिक्षणास सुरुवात. १८४७ मध्ये फुलेंनी लहुजी वस्ताद साळवेंकडून दांडपट्टा व नेमबाजीचे प्रशिक्षण घेतले. तसेच त्यांनी कबीर यांच्या विप्रमती ग्रंथाचे वाचन केले तसेच 'वाप्रसूची' या संस्कृत ग्रंथाचे वाचन केले. तसेच महात्मा फुलेंवर थॉमस पेन या विचारवंताचा खूप मोठा प्रभाव होता.

थॉमस पेन लिखित 'द राईट ऑफ मॅन' या पुस्तकाचा प्रभाव, या पुस्तकात गुलामगिरी निषेध, व्यक्ती स्वातंत्र्याचा व मानवाची प्रतिष्ठा याचा सिद्धांत मांडला. या ग्रंथातूनच प्रेरणा घेऊन महात्मा फुलेंनी लेखन कार्यास प्रारंभ केला व तत्कालीन वर्चस्ववादी सामाजिक व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले व मागास, पीडित, रांजले-गांजलेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संपूर्ण आयुष्य पणाला लावले. याच ग्रंथसंपदेचा परामर्श आपण पुढील भागात पाहणार आहोत.

१. तृतीय रत्न - १९५५ साली महात्मा फुलेंनी या ग्रंथांची रचना केली. हा त्यांचा पहिला ग्रंथ असून हे एक प्रकारचे सामाजिक नाटक होते. 'शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे' हा या ग्रंथातून संदेश दिला आहे.
२. ब्राह्मणांचे कसब - १८६९ साली महात्मा फुलेंनी या ग्रंथाची रचना केली. या ग्रंथाची रचना पद्यात्मक असून, ब्राह्मण लोक शुद्रांची कशी फसवणूक करतात याचे वर्णन यात आहे. या ग्रंथाची प्रस्तावना बाबा पदमनजी यांनी लिहिली असून हे पुस्तक कुणबी, माळी, महार, मांग यांना अर्पण केले आहे.
३. छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा - १८६९ साली रचना ग्रॅण्ड डफ यांच्या 'History of the Maratha' या पुस्तकाचा आधार घेऊन पोवाड्याची रचना केली आहे. या पोवाड्यात त्यांनी कुळवाडीभूषण अशी उपाधी स्वतःलाच लावली आहे.
४. गुलामगिरी - १८७३ साली या ग्रंथाची रचना केली गेली. हा ग्रंथ प्रश्नोत्तर स्वरूपात असून ग्रंथाच्या सुरुवातीलाच 'ज्या दिवशी मनुष्य गुलाम होतो त्या दिवशी त्याचा अर्धा सदगुण जातो' हे वाक्य आहे. एकूण सोळा प्रकरणे नऊ प्रकरणात ब्राह्मण वर्चस्व इतिहास दाखवला आहे. हा ग्रंथ अमेरिकेतील निग्रो लोकांना ज्यांनी मुक्त केले त्या मुक्तीदात्यांना हा ग्रंथ समर्पित केला आहे.

५. अस्पृश्यांची कैफियत - १८८३ साली या ग्रंथाचे रचना केली असून उच्चभ्रू वर्गाकडून अस्पृश्य वर्गाची होत असलेली पिळवणी व त्यातून अस्पृश्यांचे होणारे हाल याचे यथार्थ वर्णन केले आहे.

६. शेतकऱ्यांचा आसूड -१८८३ साली या ग्रंथाची रचना केली आहे. यात शेतकऱ्यांच्या अवनतीची कारणे व शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडली आहे. या शेतकऱ्यांची विदारक स्थिती खालील प्रमाणे दर्शवली अज्ञान आणि शेतकऱ्यांची कशी दैना झाली आहे ही यातील व्यक्तीवर दर्शवली –

विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नितीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले
इतके असमर्थ एका अविरचेने केले.

कशा पद्धतीने भटजी, नोकरशहा, सावकार शेतकऱ्याला लुबाडतात याचे वर्णन यात केले आहे.

७. इशारा - १९८५ साली या ग्रंथाची रचना केली.

"तीस वर्षापेक्षा हल्ली शेतकीची स्थिती चांगली आहे." या न्या.म.गो. रानडे यांच्या मताचे खंडन करण्यासाठी फुलेंनी रचना केली.

८. संसार भाग -१ व २ - १८८५ साली त्यांनी ग्रंथ लिहिले. यामध्ये त्यांनी भट, ब्राह्मणांचे धर्माचे कारस्थानी स्वरूपावर प्रकाश टाकला. तसेच ब्राह्मो समाज व प्रार्थना समाजाच्या अंतरंगाविषयी चर्चा केली आहे.

९. सार्वजनिक सत्यधर्म - १८९१ साली प्रकाशित झाला.

– विश्राम घोले यांनी या ग्रंथास प्रस्तावना दिली असून या ग्रंथास विश्व कुटुंबाचा जाहीरनामा असे सुद्धा म्हटले आहे. याबाबत "निती धर्माचा अमरकोश" असा उल्लेख आहे.

महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात सार्वजनिक सत्य धर्माची अधिष्ठान मानवी स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तत्त्वावर अधिष्ठित केले. हा ग्रंथ विश्वकुटुंबाचा जाहीरनामाच आहे असे मत तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी मांडले.

**सारांश –**

अशाप्रकारे विविध ग्रंथांच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकून दिंन दलितांच्या दुःखाला वाचा फोडली व त्यांना सुशय प्रवाहात आणण्यासाठी अपार हाल अपेष्टा व कष्टातून समाजकार्याचा वारसा पुढे चालू ठेवला. म्हणूनच आज आपला महाराष्ट्र पुरोगामी महाराष्ट्र म्हणून देशभर अग्रेसर आहे. महात्मा फुले यांच्या या कार्यास कोटी कोटी प्रणाम...... अशा या थोर समाज सुधारकांनी समाज सुधारण्यासाठी दिलेले संदेश जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी व त्या संदेशाचा अंमल करण्यासाठी सर्वांनीच कटिबद्ध झाले पाहिजे.

**संदर्भ:**

१. कीर धनंजय; महात्मा जोतिराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२. नरके हरी (संपा.); महात्मा फुले समग्र वांङमय आणि चळवळ, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई (२०१३).
३. साळुंखे पी.बी.(संपा.); महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (१९८२).
४. फडके य.दि.; महात्मा फुले समग्र वांङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९८२ ).
५. नरके हरी (संपा.); महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, महात्मा फुले चरित्र साधने समिती, मुंबई (२००६).
६. मोरे सदानंद; विद्रोहाचे नाव व्याकरण: महात्मा ज्योतिबा फुले यांचे निवडक साहित्य, प्रकाशन - सकाळ मीडिया, प्रा.लि., प्रथम आवृत्ती, एप्रिल, २०१८.